| | |
|---|---|
| MHNS170003432013 | दादा दगडु कदम<br>वि.<br>लिलाबाई शंकर व इतर |

**आदेश निशाणी ८८**

**नियमित दिवाणी दावा क्र.८०/२०१३**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात दुरुस्ती करुन मिळण्याबाबत दाखल केला आहे.

२. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४. वादीने प्रस्तुतच्या अर्जाद्वारे दाव्यातील प्रतिवादी क्र.७(२) हिचे नांव सखुबाई बाळु तिकांडे या ऐवजी शकुंतला बाळासाहेब तिकांडे असे टाईपिंग मिस्टेकमुळे व नजरचुकीने लिहिले आहे व सदरचे नांव सखुबाई बाळु तिकांडे अशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी म्हणून अर्ज दिलेला आहे.

५. प्रतिवादीने अर्जाच्या पाठीमागे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारली आहे. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, केवळ दावा लांबविण्याकामी सदरचा अर्ज वादीने दिल्याचा दिसून येतो.

६. माझे समोर उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील कारणांसहीत निष्कर्ष पुढीलप्रमाणेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीचा दुरुस्ती अर्ज वादाचा मुद्दा ठरविणेकामी मंजुर होण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय? | अर्ज मंजूर करण्यात आला |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ बाबत

७. वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे केवळ प्रतिवादी क्र.७(२) हिचे नांव जे शकुंतला बाळासाहेब तिकांडे असे लिहिले आहे त्याऐवजी सखुबाई बाळु तिकांडे असे लिहिण्याची परवानगी मागितली आहे. वादीने मागितलेली दुरुस्ती ही औपचारिक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. सदरची दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच, सदरची दुरुस्ती ही न्यायाच्या दृष्टीने मंजूर करणे आवश्यक आहे. शिवाय, प्रतिवादी क्र.७(२) ही मयत झाली असून तिचे मयत वारस अभिलेखावर घेण्यास सदर दुरुस्तीची मदतच होणार आहे. या कारणास्तव, वादीचा प्रस्तुतचा अर्ज हा मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ चे उत्तरार्थ पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | अर्ज (निशाणी ८८) मंजूर  करण्यात येतो. |
| २. | वादीने मुळ दाव्यामध्ये आदेशापासून १४ दिवसांच्या आत योग्य ती दुरुस्ती करावी व तशी दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी. |
| ३. | खर्चाबाबत कोणताही आदेश नाही. |

JAGDISH MADHAV AGNIHOTRI

Digitally signed by JAGDISH MADHAV AGNIHOTRI
Date: 2024.07.31 17:13:06 +0530

(जे. एम. अग्निहोत्री)

नांदगांव. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदगांव.

दि.३१/०७/२०२४ ता.नांदगांव, जि.नाशिक.

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app "**eCourts Services**" from Android or iOS